# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) (द्वारा संचालीत राज्य विद्यापीठ)

**( परीक्षा व मुल्यमापण मंडळ)**

एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली–४४२६०५
फोन नंबर ०७१३२–२२३१०४

जा.क्र./गों.वि./परीक्षा विभाग/४८६८ /२०१९ दि.२८/११/२०१९

## परीपत्रक

**विषयः– सांस्कृतीक स्पर्धा, राष्ट्रीय छात्र सेना किंवा राष्ट्रीय सेवा योजनांच्या कार्यक्रम/उपक्रमा मध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या संदर्भात पर्यायी व्यवस्था करण्याबाबत**

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने प्राचार्य/विभाग प्रमुख, सर्व संलग्नित महाविद्यालये व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग यांना कळविण्यात येते की, परीक्षांच्या संबंधित वेळापत्रकांच्या दरम्यान आंतर विद्यापीठीय किंवा राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय सांस्कृतीक स्पर्धामध्ये किंवा राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजनांच्या कार्यक्रमामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या संबंधात पर्यायी व्यवस्था करण्याकरिता सक्षम प्राधिकरणाला शिफारस करण्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ मधील कलम ५६(१) (ठ) अन्वये परीक्षेची पर्यायी व्यवस्था करण्याकरिता प्रावधान करण्यात आलले आहे.

विद्यापीठाच्या परीक्षे दरम्यान आंतर विद्यापीठीय किंवा राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय सांस्कृतीक स्पर्धामध्ये किंवा राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजनांच्या कार्यक्रमामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या संबंधात पर्यायी व्यवस्था करण्याकरिता सक्षम प्राधिकरणाला शिफारस करण्याबाबत संबंधित प्राचार्य व विभागप्रमुखांनी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची उपरोक्त उपक्रमांमध्ये निवड झाली असेल अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा येत असल्यास, अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षेची पर्यायी व्यवस्था करण्याकरिता विद्यार्थ्यांची यादी व विहित प्रपत्रासह आवश्यक दस्ताऐवज महाविद्यालयातील प्राचार्यामार्फत मा. संचालक विद्यार्थी विकास विभागाकडून प्रमाणित करून विद्यापीठातील परीक्षा व मुल्यमापन मंडळ विभागाकडे उपक्रम संपल्याबरोबर सात दिवसाचे आत सादर करावे. सदर परीपत्रकास सर्व प्राचार्यांनी आपल्या महाविद्यालयातील नोटिस बोर्डावर लावून सर्व विद्यार्थ्यांना अवगत करावे.

सहपत्रः–सादर करावयाचा विनंती अर्ज

28/11/2019

**(डॉ. अनिल झेड. चिताडे)**
**संचालक**
**परीक्षा व मुल्यमापन मंडळ**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

प्रतीलिपी

१. मा. कुलगुरू, यांचे स्विय सहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरिता सादर
२. मा. प्र–कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरिता सादर
३. मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरिता सादर
४. मा. संचालक विद्यार्थी विकास विभाग, माहितीकरिता व योग्य कार्यवाहीकरिता सादर
५. उपकुलसचिव परीक्षा पुर्व/उपरांत,गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरिता सादर
६. सहा. कुलसचिव परीक्षा पुर्व/उपरांत,गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरिता सादर
७. सहा. कुलसचिव गोपनीय विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरिता सादर
८. संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली सदर अधिसुचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करावे.

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

परीक्षेच्या संदर्भात पर्यायी व्यवस्था करण्याकरिता विनंती अर्ज
(विद्यार्थ्याने सदर अर्ज तीन प्रतीमध्ये महाविद्यालयात सादर करावा.)

प्रति
संचालक
विद्यार्थी विकास
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
मार्फतः– प्राचार्य..........................................................................

**विषयः– सांस्कृतीक स्पर्धा, राष्ट्रीय छात्र सेना किंवा राष्ट्रीय सेवा योजनांच्या कार्यक्रम/उपक्रमा मध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या संदर्भात पर्यायी व्यवस्था करण्याबाबत**

**संदर्भः–** सांस्कृतिक स्पर्धा/राष्ट्रीय छात्र सेना/राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाचे पत्र क्र..................
दिनांक..................................

**अर्जदारः–**..........................................................................

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भाकिंत विषयाच्या अनुषंगाने आपणांस विनंतीपुर्वक अर्ज सादर करतो/करते की, माझी निवड सांस्कृतिक स्पर्धा/राष्ट्रीय छात्र सेना/राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमातील........................ ..........................................................................याकरिता झालेली आहे.

मी सहभागी होत असलेल्या उपक्रमाचा कालावधी व माझ्या उन्हाळी–२०.... /हिवाळी–२०..... परीक्षेच्या वेळपत्रकाचा कालावधी तारखा येत असल्यामुळे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा २०१६मधील कलम ५६,१) (ठ) मधील तरतुदीच्या अनुषंगाने माझ्या परीक्षेच्या सदंर्भात नियमानुसार पर्यायी व्यवस्था करण्याकरिता माझ्यासदंर्भातील सविस्तर माहिती खालील तक्त्यात नमुद करीत आहे. या अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे सादर करण्यात येत असून त्यानुसार मला उन्हाळी–२०.... /हिवाळी–२०..... ची परीक्षा देता यावी यादृष्टीने कृपया योग्य ती शिफारस करावी, ही विनंती.

**सविस्तर माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र | विद्यार्थ्याचे नाव | प्रवेशित वर्ग/शाखा | परीक्षा क्रमांक | सहभागाचा कालावधी | | सदर कालावधित येत असलेल्या प्रश्नप्रत्रिका | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पासून | पर्यत | दिनांक | विषयांचे नाव |
| | | | | | | | |

**स्थळः** आपला विद्यार्थी/आपली विद्यार्थीनी

दिनांकः (विद्यार्थी/विद्यार्थीनी यांची स्वाक्षरी)

सहपत्रः
१) परीक्षा विभागाच्या प्रवेशपत्राची छायांकीत प्रत
२) परीक्षा विभागाच्या परीक्षेच्या वेळापत्रकाची छायांकीत प्रत
३) सांस्कृतिक स्पर्धा/राष्ट्रीय छात्र सेना/राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमामध्ये निवड झाल्याबद्दलच्या पत्राची छायांकीत प्रत
४) सदर कार्यक्रमात सहभागी झाल्याचे प्रमाणपत्र

**प्राचार्याची शिफारस**

आमचे महाविद्यालयातील विद्यार्थी/विद्यार्थीनी यांचे प्राप्त झालेल्या अर्जाची सहपत्रामध्ये नमुद केलेल्या दस्ताऐवजाच्या आधारे पडताळणी केली असून अर्जदार विद्यार्थी/विद्यार्थीनीच्या परीक्षेकरिता पर्यायी व्यवस्था करण्याकरिता आपणाकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात येत आहे.

**स्थळः** प्राचार्याची सही व शिक्का
दिनांकः
नाव................................

---

**संचालक, विद्यार्थी विकास, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा अभिप्राय**

उपरोक्त नमुद विद्यार्थी/विद्यार्थीनी यांचे प्राप्त झालेल्या अर्जाची प्राचार्यांनी सहपत्रामध्ये नमुद केलेल्या दस्ताऐवजाच्या आधारे पडताळणी केली असून बरोबर असल्याचे आढळले. सदर अर्जदार विद्यार्थी/विद्यार्थीनीच्या परीक्षेकरिता पर्यायी व्यवस्था करण्याकरीता आपणाकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात येत आहे.

**संचालक, विद्यार्थी विकास विभाग**

**संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ विभाग**